तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक :10/एनजीपी/मुदतवाढ/2015-16/ 908
दिनांक : 12 FEB 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे

विषय : **शैक्षणिक वर्ष 2015-16 करीता शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना प्रथम/ द्वितीय पाळी करीता मुदतवाढीबाबत..**

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत निर्गमित जाहिर सूचना 2015-16

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत शैक्षणिक वर्ष 2015-16 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेशक्षमता वाढ/ घट, नवीन अभ्यासक्रम, मुदतवाढ देणे इ.बाबत संदर्भान्वये जाहिर सूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत शैक्षणिक वर्ष 2014-15 पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे, अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष 2015-16 करीता प्रथम/ द्वितीय पाळी करीता मुदतवाढीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या जाहिर सूचनेनुसार तात्काळ कार्यवाही करावी. मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करताना ज्या संस्थेत प्रथम पाळीमध्ये अभ्यासक्रम मंजूर नाहीत अशा संस्थांनी थेट द्वितीय पाळीसाठी प्रस्ताव सादर करु नयेत, ही बाब विचारात घ्यावी. कोणत्याही पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेमध्ये प्रथम/द्वितीय पाळीकरीता मुदतवाढी शिवाय शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये प्रवेश झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांची वैयक्तिक राहील व याबाबतची जाणीव संबंधीत प्राचार्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

पुढे असेही कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील ज्या शासकीय संस्थांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता द्वितीय पाळी सुरु आहे., त्या संस्थांनाही मुदतवाढीसाठी परिषदेची मान्यता घेण्याबाबत सूचीत करण्यात यावे. त्या परिसरातील सर्व अल्पसंख्याक समुदायांना तंत्रनिकेतनांतील उपलब्ध जागांबाबत माहिती होण्यासाठी स्थानिक स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच स्थानिक उर्दु वृत्तपत्रांमध्येही उर्दुमध्ये जाहीरात देण्यात यावी. तसेच विद्यार्थी पालक यांचे मेळावे अल्पसंख्यांक वस्तीमध्ये घेण्यात येवून माहिती देण्यात यावी. सदर संस्थांमध्ये सन 2015-16 या शैक्षणिक वर्षात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतील याबाबत संपूर्ण दक्षता घेण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल उदा. अल्पसंख्यांक वस्तीमध्ये/ अल्पसंख्यांक शाळेमध्ये विद्यार्थी पालक मेळावा घेतल्याबाबतचा अहवाल सादर करावा. तसेच त्याबाबतच्या सूचना संबंधीत संस्थांच्या प्राचार्यांना आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्यात.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.**
**क्र :—तंशिसं/विकाना/पदविका/२०१५/** 501
**दि.** 18 FEB 2015

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित**
**अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,**
**नागपूर विभाग .**

**त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.**

**( गुलाबराव ठाकरे )**
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,**
**नागपूर**

**प्रत:— प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.**